# उपनिबंधक, सहकारी संस्था, आर-नॉर्थ विभाग, मुंबई यांचे कार्यालय

३०३, अे विंग, बी.एम.सी.गोडाऊन इमारत, ठाकुर कॉम्प्लेक्स, संस्कृती कॉम्प्लेक्स, ९०फिट रोड,
कांदिवली (पूर्व), मुंबई-४०० १०१

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वयेचा आदेश

जा.क्र./मुंबई/आर-नॉर्थवि/लोटस/क.८८/ ६८० /२०१७
दिनांक : १६/५ /२०१७.

वाचावे:- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ मधील तरतूद.
२) या कार्यालयाचा कायदा कलम ८३ अन्वये जा.क्र.मुंबई आर-नार्थवि/लोटस हौ/क. ८३/१५५८/२०१५ दि.०३/०९/२०१५ रोजीचा आदेश
३) चौकशी अधिकारी श्री.बी.जी. नलावडे यांनी या कार्यालयात दाखल केलेला दि.१२/०२/१५ रोजीचा चौकशी अहवाल.

ज्याअर्थी, लोटस को.ऑप.हौ.सो. लि., अंसह विहार, बोरीवली न्यु लिंक रोड, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०९२ या संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये झालेली असून तिचा नोंदणी क्र.बीओएम/डब्ल्युआर/एचएसजी/टीसी/९७९३/१९९७-९८ असा आहे. आणि,

ज्याअर्थी लोटस को.ऑप.हौ.सो. लि., अंसह विहार, बोरीवली न्यु लिंक रोड, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०९२ (यापुढे संस्था असे वाचावे) या संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (यापुढे कलम असे वाचावे) महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम १९६१ (यापुढे नियम असे वाचावे) व संस्थेच्या नोंदणीकृत उपविधीतील तरतुदीनुसार चालविले जाणे आवश्यक आहे आणि,

ज्याअर्थी संस्थेचे सभासद श्री नेहल देसाई यांनी दाखल केलेला तक्रार अर्जाच्या अनुषंगाने या कार्यालयाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये दि.०३/०९/२०१५ रोजी चौकशी करणेसाठी श्री.बी.जी.नलावडे, सेवानिवृत्त सहायक निबंधक यांची नियुक्ती करणेत आलेली होती. चौकशी अधिकारी यांनी श्री.बी.जी.नलावडे यांनी चौकशी अहवाल दि.१२/०२/२०१६ रोजी या कार्यालयात सादर केलेला आहे. उक्त चौकशी अहवालाचे अवलोकन केले असता, चौकशी अधिकारी यांनी संस्थेच्या कामकाजा संदर्भात सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मध्ये नमूद केल्याप्रमाणे आक्षेपार्ह रक्कमेची जबाबदारी संबंधीत जबाबदार व्यवस्थापक समिती सदस्य,पदाधिकारी यांच्यावर निश्चित करणेबाबत मत व्यक्त केलेले आहे. आणि

ज्याअर्थी, संस्थेच्या तत्कालीन समिती पदाधिकारी सदस्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, त्याखालील नियम १९६१ व संस्थेच्या नोंदणीकृत मंजूर उपविधीतील तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे. तद्वतच संस्थेचा आर्थिक व्यवहारात जबाबदार असणाऱ्या व्यवस्थापक / माजी समिती पदाधिकारी सदस्यांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी संबंधित व्यक्तींच्या विरुध्द कायदा कलम ८८ अन्वये जबाबदारी निश्चित करण्याकरता प्राधिकृत अधिकारी नियुक्त करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## -: आ दे श :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये मी, राजकुमार पाटील, उपनिबंधक, सहकारी संस्था, आर-नॉर्थ विभाग, मुंबई या आदेशान्वये लोटस को.ऑप.हौ.सो. लि., अंसह विहार, बोरीवली न्यु लिंक रोड, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०९२ या संस्थेच्या संबंधित व्यवस्थापक समिती पदाधिकारी, सदस्य यांनी केलेल्या गैरव्यवहारामुळे संस्थेस जे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यास कोण व किती रक्कमेस जबाबदार आहे? आणि, अशा जबाबदार असणाऱ्या व्यक्तीकडून संस्थेस झालेल्या आर्थिक नुकसानीची रक्कम व्याजासह वसुल करण्यासाठी सोबत जोडलेल्या

Scanned by CamScanner

परिशिष्ट-अ मध्ये नमुद मुद्यावर चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्याकरीता श्री.सी.एच.कदम सेवानिवृत्त सहाय्यक निबंधक प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

सदरचा आदेश माझी सही व या कार्यालयाच्या मुद्रेसह दिला असे.

(राजकुमार पाटील)
उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर-नॉर्थ विभाग, मुंबई

प्रत :-

१) चेअरमन/सचिव, लोटस को.ऑप.हौ.सो. लि., अंसह विहार, बोरीवली न्यु लिंक रोड, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०९२

२/- यांना कळविण्यात येते की, कायदा कलम ८८ (२) अन्वये चौकशी शुल्क पोटी अनामत रक्कम रु.२०,०००/- चा धनादेश मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (४), पश्चिम उपनगरे, मुंबई यांच्या नावे धनादेश या कार्यालयात जमा करावा.

२) श्री.सी एच कदम सेवा निवृत ,सहाय्यक निबंधक तथा प्राधिकृत अधिकारी , लोटस को.ऑप.हौ.सो. लि., अंसह विहार, बोरीवली न्यु लिंक रोड, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०९२, शहाहाईट्स को-ऑप.हौ. लि., अे-१५०१, खारघर सेक्टर ७, नवीमुंबई.

३) श्री.रमेश अग्रवाल, सदनिका क्रं. डी/१०८,

४) श्री.रमेश शाह, सदनिका क्रं.ए/१०२,

५) श्री.रघु कुंदन, सदनिका क्रं.बी/१०३,

६) श्रीमती रिंकी पांचाळ, सदनिका क्रं.ए/१०१,

७) श्री.जगदीश मेहता,सदनिका क्रं. डी/४०८,

८) श्रीमती.सुवर्णा लता दिवान, सदनिका क्र. डी/७०८

९) श्री.राजेंद्र पिसाट, सदनिका क्रं.ए/७०१,

१०) वरील सर्व राहणार, , लोटस को.ऑप.हौ.सो. लि., अंसह विहार, बोरीवली न्यु लिंक रोड, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०९२

१०) निवडनस्ती.

उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर-नॉर्थ विभाग, मुंबई

Scanned by CamScanner